शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
20 Sep 2025 - Page 10-city

# वाघ अभियांत्रिकी-जर्मन कंपनीत सामंजस्य करार



▶▶ नाशिक । प्रतिनिधी

के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक व जर्मनीतील ईएसई इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड सॉफ्टवेअर कंपनीत नुकताच ऑनलाईन माध्यमातून सामंजस्य करार करण्यात आला.

या कराराचा उद्देश विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, संशोधन प्रकल्प, कौशल्य विकास, ज्ञान देवाण-घेवाण तसेच उद्योग-शैक्षणिक सहकार्याच्या माध्यमातून जागतिक व्यासपीठावर संधी उपलब्ध करून देणे असल्याची माहिती प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर व माजी विद्यार्थी यज्ञेश भोर यांनी दिली. उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी व प्राचार्य डॉ. केशव नांदूरकर यांनी जर्मन प्रतिनिधींचे आभार मानले.